सोलापूर महानगरपालिकेच्या सहकब/प्रासंगीक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.234 ठ. क्र.263
दि. 19/9/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगपालिका परिवहन उपक्रमाकडील कालबाहय् व निकामी झालेल्या स्क्रॅप ३४ बसेस व ०१ जीप विक्री करणेबाबत प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे ई-टेंडरिंगद्वारे मागविलेल्या टेंडरमध्ये मे. मुचाले ट्रेडर्स, सोलापूर यांनी उपक्रमाने निश्चित केलेल्या एकूण किंमतीच्या १.०१ % वाढीव दराने दर सादर केलेले असून, त्याची रक्कम रु. ६७,२७,२६६/- (रुपये सदुसष्ट लाख सत्तावीस हजार दोनशे सहासष्ट फक्त) इतकी आहे. सदर अपेक्षित दरापेक्षा जास्तीचे असलेने दर स्विकृत करणेस हरकत नाही. तरी स्क्रॅप ३४ बसेस व ०१ जीप विक्रीकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३४५ (ड) नुसार मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. परिवहन समितीचे शिफारसीसह मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेकामी मा. परिवहन व्यवस्थापक यांचे दि. २४-८-१५ चे टिपणी प्रमाणे मा. परिवहन समिती ठराव क्र. ६२, दिनांक १९-९-२०१५ चे शिफारसीनुसार मान्यता देणेत येत आहे. तसेच परिवहन उपक्रमाकडील जीप वाहन क्रमांक एम.एच.१३-एच-०००६ याचे आयुष्यमान संपल्याने सदरचे वाहन विक्री करणेस मान्यता देणेत येत आहे.

(सही)
प्र. नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 235 ठ. क्र. 248
दि. 2/9/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रासंगिक करारबाबत प्रस्तावा सोबत जोडलेल्या मसुद्यास मंजूरी मिळणेकामी मा. परिवहन समितीपुढे सादर करणेस, व मा. परिवहन समितीच्या मान्यतेअंती मा. सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस्तव सादर करणेस्तव मा. परिवहन व्यवस्थापक यांचे दि. १-१०-१५ चे टिपणीने आलेले प्रकरणी मा. परिवहन समिती ठराव क्र. ७६ दिनांक ६-१०-१५ चे शिफारसीनुसार मान्यता देणेत येत आहे.

प्र. नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २३८ ठ. क्र. २४७
दि. १८/१/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. ३१ मधील मोदी ख्रिश्चन स्मशानभूमी सिटी सर्व्हे नं. ८३८९/१ व्ही.आय.पी. रोड सोलापूर येथे कंपौंड वॉल गेट बांधणे कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. २९/२०१५-१६ र.रु. ११,०४,५८४/- यांस स्थापत्य समितीची मान्यता मिळून बजेट तरतूदीकरिता मा.म.न.पा.सभेची मंजूरी मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ४-८-२०१५ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. १००, दि. ८-१०-१५ चे शिफारसीनुसार मान्यता देणेत येत आहे.

याकामी मनपा अंदाजपत्रक सन २०१५-१६ चे भांडवली कामाच्या खर्चाचा तक्त्यामधील अ.क्र. २२ मधील स्मशानभूमी सुधारणा करणे या तरतूदीतून बजेट तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रामुलो~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ...२४० ठ. क्र. ...२४६...
दि. ...२८।१।१६...... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



सिध्दार्थ नगर कुमठे येथे नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजने अंतर्गत पाण्याची पाईप लाईन घालणे कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. २०/२०१५-१६ र.रु. १६,४२,७०७/- यांस मा. स्थापत्य समितीची शिफारस होऊन मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. उपआयुक्त यांचे दि. ७-९-२०१५ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. ११७, दि. ८-१०-१५ चे शिफारसीनुसार मान्यता देणेत येत आहे.

प्र नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज..२५१.ठ. क्र......२४४
दि...१८/९/१५.......रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



नगररचना योजना क्र. ३ अंतिम भूखंड क्रमांक -२३ (भाग) या जागेतील आ.क्र. ६/९ **डिस्ट्रीक्ट सेंटर** मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदला बाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित प्रकरणी सविस्तर अहवाल सादर करुन सदर प्रस्ताव मा.शासनास पाठविणेकामी माननियांची मान्यता मिळालेवरुन उक्त फेरबदलाबाबतचा प्रस्ताव मा. शासनाकडे अंतिम मान्यतेसाठी सादर करणेत आलेला होता. तथापि प्रस्तावात नमूद संदर्भ क्र. ३ ने सहा. संचालक शाखा कार्यालय सोलापूर यांनी मा.शासनाकडे सादर केलेल्या अहवालासोबत राजपत्रामध्ये जाहिर प्रसिध्दी करुन सूचना/हरकती मागविले नंतर मा. सर्वसाधारण सभेचा अंतिम ठराव सादर करणे आवश्यक असल्याचे कळविलेले आहे. वास्तविक पाहता प्रस्तावात नमूद संदर्भ क्र. २ अन्वये मा. शासनास सादर केलेल्या अहवालामध्ये विहीत मुदतीमध्ये कोणतीही सूचना/हकरत प्राप्त झाली नसल्याचे कळविलेले आहे. तथापि सहा. संचालक नगर रचना यांचे पत्रानुसार उक्त आरक्षणामध्ये फेरबदल करणेकामी मा. शासनाकडे अंतिम ठराव सादर करणेसाठी मा. सर्वसाधारण सभेचे मान्यतेचा ठराव पारित करणेकामी मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. १८-९-१५ चे टिपणीनुसार मान्यता देणेत येत आहे.

(signature)
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 282 ठ. क्र. 265
दि. १९/१/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. ४२ मध्ये शिवगंगा नगर भाग-४ येथे स्वामी घर ते शिरसाट यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. १७/२०१५-१६ र.रु. ३,९७,९९०/- इतकी बजेट तरतूद उपलब्ध होऊन मिळणेकामी मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस्तव मा. प्र. आयुक्त यांचे दि. ११-९-१५ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

याकामी मनपा अंदाजपत्रक सन २०१५-१६ चे भांडवली कामाच्या खर्चाचा तक्त्यामधील अ.क्र. १ मधील रस्ते बांधणे या तरतूदीतून बजेट तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

प्र नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रासंगी/विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज २४४ ठ. क्र २५९
दि. १९/१/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



राजीव आवास योजनेच्या पूर्व तयारीकरिता शहर तांत्रिक कक्षात १) जीआयएस स्पेशॉलिस्ट-श्री. सचिन अनिलकुमार कांबळे (नोडल ऑफिसर संगणक विभाग अतिरिक्त पदभार) २) सोशल डेव्हलपमेंट स्पेशॉलिस्ट-श्री. लक्ष्मण सिध्दप्पा बाके (प्रकल्प संचालक यु.सी.डी. अतिरिक्त पदभार) ३) कॅपॅसिटी बिल्डींग/ट्रेनिंग कोऑर्डिनेटर-श्री.दत्तात्रेय बंडू चौगुले (नोडल ऑफिसर एस.बी.एम.) यांना नेमलेल्या तज्ञांचे मानधनाबाबत व त्यांची सेवा सुरु ठेवणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांनी त्यांचेकडील जा.क्र.एमएच/मुअ-२/उमुअ/काअ-२/रे/प्रा/न.क्र./२१८/१५, दि. २४-२-२०१५ च्या पत्रान्वये राज्य शासनाद्वारे देण्यात येणा-या निधीतून शहर तांत्रिक कक्षातील तज्ञांच्या मानधनाच्या घटकांवर सद्यस्थितीत पुढील सूचना मिळेपर्यंत दि. १-३-१५ पासून खर्च अनुज्ञेय ठरत नाही. तेव्हा अशा तज्ञांची सेवा तशीच पुढे सुरु ठेवावयाची झाल्यास मनपाने स्वनिधीतून मानधन देणेचे आहे. ही बाब तसेच यापूर्वी दि. १९-३-२०१५ रोजीने सादर केलेल्या प्रस्तावात नमूद प्रमाणे धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक असल्याने प्रकरण पुनश्च मा. म.न.पा.चे निर्णयास्तव व आजला प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे मुदतवाढ दिले असल्याची बाब माहितीस्तव मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ४-९-१५ चे टिपणीप्रमाणे आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

Certified CPP
प्र नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज..२४५..ठ. क्र..२६०..
दि..१९/१/१६.......रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



पाणी पुरवठयाच्या उत्पन्नातील घट कमी करणे कामाचे उपाय योजना करणेकामी Capacity Building for Urban Developing strategy for reduction of non revenue water (NRW) implementation करिता अंतिम Draft report नुसार योजना राबविणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सोलापूर शहरात Capacity Building for Urban Developing strategy for reduction of non revenue water (NRW) ही योजना राबविणेस व सुधारणा करणेचा अंतिम अहवाल (DFR) मा. सर्वसाधारण सभेपुढे मान्यता मिळणेस्तव तसेच तांत्रिक मान्यता व अनुदान/निधी प्राप्त होणेस मा. केंद्र शासनाकडे अमृत योजना/स्मार्ट सिटी किंवा जागतिक बँक यापैकी कोणत्याही एका योजनेमधून मंजूरीस्तव (८० % : १०% : १० % अंतर्गत ) सादर करणेस्तव तसेच या योजना अंतर्गत प्रकल्प किमतीच्या १० % म.न.पा.हिस्सा भरणेस व योजना राबविणेस लागणारा मा. सर्वसाधारण सभेचा ठराव पारित होणे आवश्यक आहे.

त्यानुसार र.रु. २८१.२५ कोटीचा DFR ला मा. सर्वसाधारण सभेची धोरणात्मक मान्यता मिळणेस्तव सदरचा DFR (vol-I, vol-II) मा. केंद्र शासनाकडे सादर करणेस तसेच वित्तीय आकृतीबंधाप्रमाणे १० % म.न.पा.हिस्सा र.रु. २८.१२ कोटीची तरतूद होणे आवश्यक असून उपरोक्तप्रमाणे मा. शासनाकडून ८०:१०:१० प्रमाणे मंजूरी न मिळालेस शासनाकडून अन्य योजनेचे अनुषंगाने केंद्र शासन योजनेअंतर्गत ५० : २५ : २५ अथवा मा. महाराष्ट्र राज्य शासन नगरोत्थान योजनेअंतर्गत ७०:३० याप्रमाणे अन्य योजनेअंतर्गत करुन घेणे तसेच या अनुषंगाने सर्व कार्यवाही ठेवणेचा संपूर्ण अधिकार मा. आयुक्तांना देणे व याकामी आवश्यक म.न.पा. हिस्सा तरतूद होणेस्तव मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेकामी व आवश्यक तो पत्रव्यवहार करणेस संपूर्ण अधिकार मा. आयुक्तांना देणेबाबतचा धोरणात्मक निर्णय घेणेकामी मा. आयुक्त यांचे २४-९-१५ चे टिपणीनुसार मान्यता देणेत येत आहे. मा. आयुक्त यांनी याबाबत वेळोवेळी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

(signature)
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २४८ ठ. क्र. २५१
दि. १९/१/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयास पुष्पहार घालण्यासाठी शिडी बसविणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सदर कामाचे सविस्तर पूर्वगणनपत्रक क्र. ५/२०१५-१६ र.रु. ३४,१३,०००/- इतकेचे तयार केले असून सदर पूर्वगणनपत्रकास व याकामी बजेट तरतूद उपलब्ध होऊन मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २३-९-१५ चे टिपणीनुसार मान्यता देणेत येत आहे.

याकामी मनपा अंदाजपत्रक सन २०१५-१६ चे भांडवली कामाच्या खर्चाचा तक्त्यामधील अ.क्र. ३ मधील शहरातील पुतळे परिसर सुधारणा करणे व नविन पुतळे बसविणे व स्मारक बांधणे या तरतूदीतून बजेट तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

प्र नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २४९ ठ. क्र. 252
दि. १९/२/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला



प्रभाग क्र. ३८ अ भारतरत्न इंदिरा नगर येथे ६ ड्रेनेज लाईन काढून ९ ड्रेनेज लाईन घालणे व घरजोड कनेक्शन करणे प्रस्तावात नमूद कारणास्तव सदर कामाचे पूर्वगणनपत्रक क्र.- /२०१५-१६ र.रु. १९,२०,०१३/- इतकेचे तयार केले असून, याकामी बजेट तरतूद होवून मिळणेस तसेच सदर ठिकाणी मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम १८८ (२) नुसार घरजोड ड्रेनेज कनेक्शन करणेचे कामास मंजूरी मिळणेबाबत प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ३-१०-१५ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सदरकामी सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

Gaikwad P.P.
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका